लक्ष्मी लॉन्स मंगल कार्यालय
फक्त ५१०००/- रु.
जेवणासह (अटी लागू)
• निसर्गरम्य हवेशिर वातावरण • पाण्याची भरपूर सोय • जेवणासाठी स्वतंत्र हॉल • वधू-वरांना स्वतंत्र रूम्सची सोय • २४ तास लाईटची सोय
श्री स्वामी समर्थ सेवा आश्रम ट्रस्ट
अक्कलकोट-सोलापूर एन.एच.रोड, अक्कलकोट
मो. ९३२६१५८१५१ / ८६२५००५१११



दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com



कंट्रक्शन
आमच्याकडे कमर्शियल रेसिडेंशियल बंगलोज अपार्टमेंट दर १६५० चौ. फुटप्रमाणे मटेरियलसह लॉक अँड की प्रोजेक्ट करून दिले जातील. संकल्प इंजीनियर्स
मो. ९३७१५२३९३९



सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष १९ वे, अंक २७ वा | मंगळवार, दि. १३ ऑगस्ट २०२४ | पाने ४ | पोष्ट परवानाः - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR



कामिनी गांधी
संस्था, फॅशन डिझायनिंग
सरकारमान्य सर्टिफिकेट
गारमेंट मॅन्यु. अँड फॅशन डिझायनिंग - फर्स्ट ईयर
फॅशन डिझायनिंग अँड फॅशन टेक्नॉलॉजी - सेकंड ईअर
कॉम्प्युटराईज्ड फॅशन डिझायनिंग अॅण्ड टेक्नॉलॉजी - थर्ड ईअर
▸ फॅशन ड्रेस डिझायनिंग
▸ फॅशन ब्लाऊज डिझायनिंग ▸ प्रिंसेस ब्लाऊज ▸ अरी वर्क ▸ पार्टीवेअर गाऊन
एका वर्षात कुटुंबातील कमवता सदस्य व्हा.
या... पहा.. शिका..!
३६३, दक्षिण कसबा, युनिक हॉस्पिटल समोर, जुनी फौजदार चावडी, सोलापूर
9850117867, 9096495025


# मोहोळला एकत्रित करून एक उमेदवार ठरवा, आपल्या मागे शरद पवार यांची ताकद - जयंत पाटील

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाची ह्यशिवस्वराज्य यात्राह्ण सध्या सुरु आहे. आज ही यात्रा सोलापुरात आहे. यावेळी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी सोलापूरकरांना संबोधित केलं.

तेव्हा त्यांनी आमदार रवी राणा यांच्यावर टीका केली आहे. लोकसभा निवडणुकीच्या पराभवानंतर सत्तेतील नेत्यांनी काढून ठेवले आहेत. वडनेराचे आमदार रवी राणा म्हणाले, मला मत नाही दिले तर तुमच्या खात्यात दिलेले पैसे काढून घेईन... भाजपाच्या समर्थक आमदार एवढी माग्रुरी दाखवत आहे. आपला पराभव होणार हे माहिती आहे म्हणून यांनी योजना काढल्या आहेत आणि जाहिरातीसाठी 280 कोटी खर्च केला आहे, असं जयंत पाटील म्हणाले.




### यंदा जास्तीत जास्त आमदार निवडून आणायचे- जयंत पाटील

लोकसभा निवडणुकीत भाजपचा पराभव होईल, असं देशात कोणाला वाटत नव्हतं. मात्र महाराष्ट्र आणि सोलापूर जिल्ह्याने कामगिरी केली. 2019 च्या निवडणुकीआधी शरद पवार साहेब सोलापूरला आले तेव्हा प्रचंड गर्दी केली. मागीलवेळी शिवस्वराज्य यात्रा काढली. त्यावेळी 54 जागी विजयी झालो. यावेळी कितीतरी जास्त जागी आम्ही निवडून येऊ... त्यासाठी आपण सगळ्यांनी मिळून काम करायचं आहे, असं जयंत पाटील म्हणाले. महाराष्ट्रातील दोन मराठी नेत्यांनी निर्माण केलेले दोन्ही पक्ष भाजपने फोडले. पवार साहेबांना सोडून गेलेल्या नेत्यांसोबत जनता गेली का तर नाही. महाराष्ट्रात मोठ मोठे इव्हेंट पाहायला मिळतात. प्रभाव निर्माण करण्याचा प्रयत्न सुरू आहे. लोकसभा निवडणुकीच्या पराभवानंतर सत्तेतील नेत्यांनाही परभवाची चाहूल लागली आहे. आता आपण काम करायचं आणि आपलं सरकार आणायचं आहे, असं जयंत पाटील म्हणाले.

### कार्यकर्त्यांना सूचना

राज्यात आणि मोहोळमध्ये राष्ट्रवादी शरद पवार गटचा आमदार निवडून येणार आहे. साताऱ्यातील महेश शिंदे नमक आमदार म्हणतात, की आत्ता तुम्ही निधी घ्या. निवडणुकीनंतर स्क्रूटीनी करूङ्घ. आता वेळ आली आहे महाराष्ट्रातील सरकार बदलण्याची... आता आपण कामाला लागले पाहिजे. मोहोळमध्ये एकत्र येऊन एकच उमेदवार ठरवा. 100 टक्के विजयी होणारा उमेदवार निवडा आणि उमेदवार कसा विजयी होईल ते पहा, अशा सूचना जयंत पाटील यांनी राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या कार्यकर्त्यांना केल्या आहेत.




## अनगरचे अप्पर तहसील कार्यालय रद्द करण्यासाठी मोहोळ येथे तिरडी आंदोलन



**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** अनगर येथील अप्पर तहसील कार्यालय रद्द करण्याच्या मागणीसाठी मोहोळ तालुका बचाव संघर्ष समितीच्या सदस्यांनी तसेच मोहोळ शहरातील तरुणांनी तिरडी आंदोलन काढत जोरदार घोषणाबाजी केली.

**गेल्या पंधरा दिवसांपासून आंदोलने, उपोषणे सुरू**

गेल्या पंधरा दिवसांपासून वेगवेगळ्या मागार्ने मोहोळ तालुक्यातील अनगर येथील अप्पर तहसील कार्यालय रद्द करण्याच्या मागणीसाठी आंदोलने, उपोषणे सुरू आहेत. गेल्या चार दिवसांपासून मोहोळ तहसील कार्यालयासमोर मोहोळ शहरातील ४ तरुण आमरण उपोषण करत आहेत. मोहोळ शहरातील बाजारपेठ तीन दिवस पूर्णतः ठप्प होती. त्यानंतर ही प्रशासनाकडून कोणतीही दखल न घेतल्याने मोहोळ शहरातील संतप्त सर्वपक्षीय युवक कार्यकर्त्यांनी मोहोळ तालुका बचाव संघर्ष समितीच्या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराज चौकातील उड्डाणपूला खालून आमदार यशवंत माने यांचा फोटो लावलेले तिरडी आंदोलन काढले.

मुख्य रस्त्यावरून हे आंदोलन तहसील कार्यालयासमोर आल्यानंतर आजी- माजी आमदारांच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करत अनगरचे अप्पर तहसील कार्यालय रद्द करण्याची मागणी करण्यात आली. पोलिसांनी आंदोलनात घुसून तिरडी ओढून बाहेर काढून नेली. यावेळी मोहोळ शहरासह तालुक्यातील सर्वपक्षीय युवक, कार्यकर्ते उपस्थित होते.

## दोन लाखांची लाच मागणाऱ्या मंडलाधिकारी, तलाठ्यावर गुन्हा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** संगणकीकरणामुळे जागेचा बंद झालेला सात-बारा उतारा मिळण्याकरिता तहसील कार्यालयात प्रस्ताव सादर करण्यासाठी चार लाख रुपयांची लाच मागितली आणि त्यातील दोन लाख रुपयांचा पहिला हप्ता स्वीकारण्यास संमती देऊन त्यानुसार लाचेची मागणी केल्याप्रकरणी उत्तर सोलापूर तहसील कार्यालयातील एका मंडल अधिकाऱ्यासह तलाठ्याविरुद्ध लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने गुन्हा दाखल केला आहे.

संदीप भीमराव लटके असे संशयित लाचखोर मंडल अधिकाऱ्याचे नाव आहे. तो उत्तर सोलापूर तहसील कार्यालयाअंतर्गत सोरेगाव महसूल मंडलात नेमणुकीस आहे. तर त्याचा साथीदार पवनकुमार मोहनराव चव्हाण हा तलाठी त्याच्याच नियंत्रणाखालील नेहरूनगर सज्जावर नेमणुकीस आहे.

या दोघांविरुद्ध जेलरोड पोलीस ठाण्यात लाचलुचपत प्रतिबंधक कायद्याखाली गुन्हा दाखल झाला आहे. यातील तक्रारदार पर्यवेक्षक म्हणून सेवेत असलेल्या एका कंपनीच्या मालकीचा ८६.६७ आर क्षेत्रफळ आकाराचा भूखंड शहरातील विजापूर रस्त्यावर नेहरूनगर भागात आहे. महसूल प्रशासनात झालेल्या संगणकीकरणामुळे या भूखंडाचा सात-बारा उतारा बंद झाला नव्हता. हा सात-बारा उतारा पुन्हा सुरू करण्याच्या अनुषंगाने महसूल अधिनियम कलम १५५ अंतर्गत उत्तर सोलापूर तहसील कार्यालयात प्रस्ताव सादर करायचा होता. या कामासाठी मंडल अधिकारी संदीप लटके व तलाठी पवनकुमार चव्हाण या दोघांनी मिळून तक्रारदाराकडे सहा लाख रुपयांची लाच मागितली. तडजोडीअंती चार लाख रुपयांची लाच देण्याचे ठरले. त्याचा पहिला हप्ता दोन लाख रुपये स्वीकारण्यासाठी लटके व चव्हाण यांनी संमती देऊन लाचेची मागणी केली.

याबाबत तक्रारदाराने थेट लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार केली. त्यानुसार लाचेच्या मागणीबाबत पडताळणी केली असता, लाच मागणीचा प्रकार उजेडात आला. पोलीस अधीक्षक गणेश कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक उमाकांत महाडिक यांच्यासह शिरीषकुमार सोनवणे, अतुल घाडगे, सलीम मुल्ला, स्वामीराव जाधव या पोलीस कर्मचाऱ्यांनी ही कारवाई केली.

## तर बहीण विचारणारच ना दादा नऊ वर्ष कुठं होतात? लाडकी बहीण योजनेवरुन सरकारला सवाल

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** शिवस्वराज्य यात्रा आज (सोमवार) सोलापूर जिल्ह्यातील माळशिरस मतदारसंघात दाखल झाली. यावेळी खासदार डॉ अमोल कोल्हे यांनी आपल्या भाषाणाच्या सुरुवातीलाच म्हणाले की, राजकारणा आधीपासून विजयसिंह मोहिते पाटील यांच्याशी आपला स्नेह आहे.

उत्तम जानकर यांच्या वक्तृत्वाचा चाहता असल्याचे सांगितले. महायुतीच्या सरकारवर टीका करताना त्यांनी महाराष्ट्रच्या राजकारणाची नासाडी केल्याचे ताशेरे ओढले. संस्कृतीला गालबोट लावण्याचे काम महायुतीतल्या नेत्याकडून होतं आहे, असेही ते म्हणाले.

यशवंतराव चव्हाण यांच्या काळात राजकारणात विचार, संवाद, सुससंस्कृततेला आदराच स्थान होतं, आता विरोधी पक्षातला बोलला की सत्ताधारी आपोआप बोलतात की, 'सरकार के खिलाफ जादा मत बोल, ईडी सीबीआय लगा देंगे.'

पुढे आपल्या भाषाणात



खासदार कोल्हे म्हणाले, निलेश लंके यांनी निर्यात शुल्क कमी करण्याचे आंदोलन केलं होतं, तर त्याला मॉर्फ करून व्हिडीओ पसरवला, हे कांदा निर्यात शुल्क विरोधात आंदोलन म्हणून परसवलं गेले. आज भारतातील निर्यात शुल्क - चाळीस टक्के म्हणजे 650 डॉलर आणि पाकिस्तान निर्यात शुल्क 350 डॉलर आहे. जागतिक पातळीवर 10 टक्के निर्यात होते. आपण भरत असलेल्या कराबद्दल जन्माला आल्यापासून जाईपर्यंत 18 टक्के जीएसटी लागतो. मात्र उद्योजकांना करात सूट दिली जाते, असा आरोप अमोल कोल्हे यांनी केला.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेबद्दल बोलताना खासदार कोल्हे म्हणाले की, राज्यातली योजना वाईट नाही त्याच्या हेतू बद्दल वाईट वाटतं. नऊ वर्ष न येणारा भाऊ दहाव्या वर्षी येतो,बहीण विचारणारच ना दादा नऊ वर्ष कुठं होतात. म्हणून लक्षात ठेवा, काळ्या दगडावरची रेघ आहे महाविकास आघाडीच सरकारच येणार आहे. धैर्यशील दादा बोलले की पुणे जिल्हापेक्षा जास्त आमदार निवडून देऊ त्याचे आभार, अभिनंदन. सोलापूरातील जनेतला धैर्यशील मोहितेच्या रुपाने आधाराचा हात मिळाला आहे.

# बारावीची परीक्षा ११ फेब्रुवारीपासून, तर दहावीची परीक्षा २४ फेब्रुवारीपासून

**पुणे (कटूसत्य वृत्त):-** विद्यार्थ्यांनो, तुम्ही दहावी-बारावीच्या परीक्षेची तयारी करत असाल, तर तुमचे अभ्यासाचे वेळापत्रक थोडेसे अलीकडे घेऊन ठेवा. होय, कारण राज्य मंडळाने यंदा दहावी-बारावीच्या परीक्षेच्या नियोजित तारखा जाहीर केल्या आहेत. त्यानुसार, दरवर्षीच्या तुलनेत यंदा परीक्षा आठ ते दहा दिवस अगोदरच सुरू होणार आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे फेब्रुवारी-मार्च २०२५ मध्ये होणारी बारावीची परीक्षा ११ फेब्रुवारीपासून, तर दहावीची परीक्षा २१ फेब्रुवारीपासून सुरू होणार आहे. राज्य मंडळाने दहावी-बारावीच्या परीक्षेच्या तारखा जाहीर केल्या आहेत. राज्य मंडळाच्या वतीने पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर आणि कोकण या नऊ विभागीय मंडळामार्फत घेण्यात येणारी बारावीची परीक्षा दरवर्षी फेब्रुवारीच्या तिसऱ्या आठवड्यात आणि दहावीची परीक्षा मार्चच्या पहिल्या आठवड्यात आयोजित केली जाते. तर बारावीचा निकाल मे महिन्यात, तर दहावीचा निकाल जूनच्या पहिल्या आठवड्यात जाहीर करण्यात येतो. त्यानंतर अनुत्तीर्ण तसेच श्रेणीसुधार अंतर्गत प्रविष्ट विद्यार्थ्यांसाठी




जुलै-ऑगस्टची पुरवणी परीक्षा साधारणतः जुलैच्या तिसऱ्या आठवड्यापासून घेतली जाते.

दरम्यान, विद्यार्थ्यांच्या पुढील शैक्षणिक वषार्ची प्रवेश प्रक्रिया वेळेवर होणे, व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेश परीक्षा या मंडळाच्या परीक्षेनंतर आयोजित केल्या जातात. अशा परीक्षांचा अभ्यास करण्यास विद्यार्थ्यांना पुरेसा वेळ मिळावा, तसेच पुरवणी परीक्षा लवकर घेऊन त्याचा निकालही लवकर जाहीर करणे, याचा सारासार विचार करता फेब्रुवारी-मार्च २०२५ मध्ये होणारी बारावी-दहावीची परीक्षा नेहमीपेक्षा आठ ते दहा दिवस आधी आयोजित करण्याचा राज्य मंडळाचा मानस आहे, असे राज्य मंडळाच्या सचिव अनुराधा ओक यांनी सांगितले. त्यानुसार दहावी-बारावीच्या बोर्डाच्या परीक्षांच्या संभाव्य तारखा राज्य मंडळाने जाहीर केल्या आहेत.

शाळा, कनिष्ठ महाविद्यालये आणि विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रमाचे नियोजन करण्याच्या हेतूने, तसेच विद्यार्थ्यांच्या मनावरील ताण कमी होण्याच्या दृष्टीने फेब्रुवारी-मार्च २०२५ च्या प्रात्यक्षिक व लेखी परीक्षेच्या नियोजित तारखा जाहीर केल्या आहेत. प्रात्यक्षिक परीक्षा, श्रेणी, तोंडी, अंतर्गत मूल्यमापन परीक्षा व लेखी परीक्षांचे सविस्तर विषयांचे वेळापत्रक स्वतंत्रपणे मंडळाच्या संकेतस्थळावर यथावकाश जाहीर करण्यात येईल, असे राज्य मंडळाने स्पष्ट केले आहे. तसेच या तारखांबाबत काही सूचना, हरकती असल्यास त्या २३ ऑगस्टपर्यंत 'secretary.stateboard@gmail.com' या ईमेलवर पाठवाव्यात, असे राज्य मंडळाने नमूद केले आहे.

**दहावी-बारावीच्या परीक्षेच्या नियोजित तारखाः**

- तपशील : लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा कालावधी
- बारावी (सर्वसाधारण व द्विलक्षी विषय) आणि उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रमः ११ फेब्रुवारी ते १८ मार्च २०२५
- बारावी- प्रात्यक्षिक,श्रेणी, तोंडी परीक्षा आणि अंतर्गत मूल्यमापन : २४ जानेवारी ते १० फेब्रुवारी २०२५
- दहावी परीक्षा : २१ फेब्रुवारी ते १७ मार्च २०२५
- दहावी- प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी परीक्षा व अंतर्गत मूल्यमापनः ३ फेब्रुवारी ते २० फेब्रुवारी २०२५

## सोलापूर विमानसेवेसाठी परवानगी मिळण्याचा मार्ग अंतिम टप्प्यात

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** एकीकडे बोरामणी आंतरराष्ट्रीय कॉर्गो विमानतळ उभारणी रखडलेली असताना दुसरीकडे सोलापूरच्या होटगी रस्त्यावरील जुन्या विमानतळावरील बहुप्रतीक्षित विमानसेवा उशिरा का होईना, अखेर सुरू होण्याची चिन्हे स्पष्ट झाली आहेत.

येत्या सप्टेंबरमध्ये विमानसेवेचा परवाना मिळाल्यानंतर पुढील ऑक्टोबरमध्ये प्रत्यक्ष विमानसेवा सुरू होण्याची अपेक्षा आहे. सोलापूरचे सध्याचे छोटेखानी, जुने



विमानतळ अवघे ३५० एकर क्षेत्रफळ आकाराचे आहे. या विमानतळावरून यापूर्वी फेब्रुवारी २००९ मध्ये सोलापूरचे तत्कालीन पालकमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील यांच्या पुढाकाराने किंगफिशर रेड कंपनीने आठवड्यातून चार दिवस मुंबई-सोलापूर-मुंबई दरम्यान ७२ आसनी विमानसेवा सुरू केली होती. त्यास चांगला प्रतिसाद मिळत असतानाच अचानकपणे ही विमानसेवा ऑगस्ट २०१० मध्ये बंद झाली. त्यानंतर गेली १४ वर्षे सोलापूरची विमानसेवा प्रतीक्षेत राहिली असताना दुसरीकडे तत्कालीन केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी केंद्रातील वजन वापरून सोलापूरजवळ बोरामणी परिसरात सुमारे दोन हजार एकर जमीन संपादित करून आंतरराष्ट्रीय कॉर्गो विमानतळ उभारण्याचा मार्ग खुला केला होता. आवश्यक भूसंपादन होऊनही या आंतरराष्ट्रीय विमानतळाची विमानसेवा आजतागायत रखडली आहे. यात वन विभागाच्या आरक्षित जमिनीचा अडसर असल्याचे सांगितले जाते. परंतु त्यावर मार्ग निघाला नाही.




## संपादकीय

# योग्य निर्णय

बहुचर्चित 'वक्फ' दुरूस्ती विधेयक लोकसभेत सादर करण्यात आले. त्याला विरोध करत झालेल्या गदारोळाच्या पार्श्वभूमीवर हे विधेयक आता संयुक्त संसदीय समितीकडे अर्थात 'जेपीसी'कडे पाठवण्याचा निर्णय घेण्यात आला. सरकारने हे एक चांगले पाऊल उचलले आहे. त्यांनी तसे केले नसते तर हा गदारोळ संसदेपासून गल्लीबोळापर्यंत होत राहिला असता. त्यातून विधेयकात केल्या गेल्या नसलेल्या दुरूस्तींचीही चर्चा झडत राहिली असती आणि त्यामुळे अल्पसंख्याकांच्या मनात अकारण संशयाचे भूत बसवले गेले असते. ते आता टाळले जाणार आहे. वक्फ अथवा अन्य कोणत्याही विधेयकाच्या निमित्ताने एक बाब मात्र अधोरेखित झाली आहे की विरोध असावा, तथापि, तो विधेयकाच्या गुण–दोषाच्या आधारावर केला जावा. केवळ आपल्याला विरोधकाची जबाबदारी मिळाली असल्यामुळे आपण अंधविरोध करावा असे नसते. ते यापुढे सगळ्याच राजकीय पक्षांनी अंगी बाणवणे गरजेचे ठरावे. लोकशाही देशात सुधारणेसाठी उचलण्यात आलेले कोणतेही पाऊल अथवा धोरण तयार करण्यासाठी नवे काम सुरू करणे कधीच सोपे नसते. भारतात लोकशाही असल्यामुळे भारतही त्याला अपवाद नाही. सरकार कोणतेही असो त्यांच्या निर्णयाला विरोध करण्याची प्रथा जुनी आहे. त्याची सुरुवात अगदी हिंदू कोड बिलापासूनही होऊ शकते. पंडित नेहरूंनाही त्यावेळी बर्‍याच अडचणींचा सामना करावा लागला होता.

आताच्या अगदी अलीकडच्या काळातील उदाहरण द्यायचे झाल्यास नागरिकत्व दुरूस्ती कायद्याचे अर्थात सीएएचे देता येईल. तीन कृषिविषयक कायद्यांना झालेला विरोधही डोळ्यांसमोर आहे. डोळसपणे विचार केला तर नागरिकत्व दुरूस्ती विधेयकाला झालेला विरोध कदाचित किती अप्रस्तुत होता ते आता शेजारी बांगलादेशात घडत असलेल्या घटनांवरून लक्षात यावे. त्या देशात अल्पसंख्य असलेल्यांना ठरवून लक्ष्य केले जाते आहे. अशाच शेजारी देशांतील हिंदूंना व अन्य धर्मियांना भारताचे नागरिकत्व देण्याच्या बाबत सरकारने तो पुढाकार घेतला होता. मात्र भारतात त्यासंदर्भात अनेक गैरसमज निर्माण करत भारतातील अल्पसंख्याकांचे नागरिकत्व यामुळे धोक्यात येईल अशी भीती घातली गेली. ज्यांनी कायद्यातील तरतुदींचा अभ्यास केला आहे आणि त्यांची भीती जर निराधार नसेल तर त्यांनी याविषयी सरकारशी आणि संबंधितांशी चर्चा करणे हाच उपयुक्त मार्ग आहे. त्याकरता संपूर्ण देशात अनिश्चिततेचे आणि भीतीचे वातावरण करण्याची आवश्यकता नव्हती आणि नाही. ज्याच्यावर अन्याय होतो, जो पीडित आहे त्याला उभारी देणारे निर्णय होत असतील तर त्याच्या विरोधात अनाठायी प्रक्षोभ निर्माण करू नये. लोकशाहीत सुधारणावादी, प्रगतीशील आणि उदार विचारांनाच थारा असतो.

कोणताही नवा पुढाकार घेण्याचा जर सरकारच्या पातळीवर प्रयत्न केला गेला की काही ठराविक चेर्हयांकडून त्याला विरोध सुरू होतो. दुर्दैव असे की हा विरोध अभ्यासांती किंवा कशाच्या आधारावर नसतो तर अंधविरोध असतो. त्याहून गंभीर बाब म्हणजे सर्वसमावेशकतेचा आग्रह धरणारी मंडळीही कळत न कळत या अंधविरोध करर्णायांच्या मागे राजकीय लाभाच्या गणितामुळे फरफटत नेले जातात. जाणकारांच्या म्हणण्यानुसार वक्फच्या नियमांमध्ये साधारण 40 दुरूस्त्या केल्या जाणार आहेत. त्यात प्रामुख्याने वक्फ बोर्डाच्या काही अमर्याद अधिकारांचाही समावेश असू शकतो.

मात्र खरेच तसे आहे का आणि आणखी काय केले जाणार आहे याची पूर्ण शाहनिशा अद्याप कोणीही केलेली नाही. त्याकरताच आता संयुक्त संसदीय समितीकडे हे दुरूस्ती विधेयक पाठवले गेले हे शहाणपणाचे पाऊल ठरावे. मघाशी म्हटल्याप्रमाणे गुण–दोषाच्या आधारावर विरोध केला जाणे जिवंतपणाचे लक्षण आहे. मात्र भारताच्या राजकारणात विरोधासाठी विरोध हेच प्रबळ राजकारण ठरत चालले आहे. वक्फ बोर्ड असेल अथवा अन्य कोणती यंत्रणा त्याला सरकारचा आक्षेप नसतो. जे आहे त्यात कालमानाने काही सुधारणा आणि व्यापक जनहितासाठी काही बदल करता येतील का, हा त्यामागे उद्देश असतो.

एका राज्याने यासंदर्भात काही काळापूर्वी केलेली कृती या दृष्टीने दिशादर्शक ठरावी. एका माफियाने वक्फच्याच मालमत्तेवर कब्जा केला होता. ती मालमत्ता खाली करत सरकारने तेथे रूग्णालय सुरू केले असून गरीब मुस्लिमांना त्याचा लाभ होतो आहे. अन्य काही ठिकाणीही वक्फच्या जमिनी बळकावल्या गेल्याच्या अथवा परस्पर विकल्या गेल्याच्या घटना आणि आरोप झाले आहेत. राजधानी दिल्लीतच या स्वरूपाचे खटले काही राजकीय मंडळींविरूद्ध सुरू आहेत. त्या दृष्टीने जर विधेयकात काही दुरूस्ती सूचवल्या गेल्या तर त्या अंतिमतः लाभदायीच असतील. मुस्लीम समुदायातील गरीब वर्गच त्याचा लाभार्थी ठरेल. संयुक्त संसदीय समितीत आता ज्यावेळी विधेयकावर चर्चा होईल त्यावेळी कदाचित पक्षीय राजकारणाच्या पलिकडे जात विचार केला जाईल.

त्याचा फायदा असा होईल की कोणतीही चर्चा न करता सरकारने तडकाफडकी आणि एकतर्फी पद्धतीने हे विधेयक संमत करून घेतले अशा आरोपांना स्थान राहणार नाही. विद्यमान सरकारच्या पहिल्या आणि दुर्सया कार्यकाळात असे प्रकार घडले आहेत व त्यामुळे विरोधकांनाही हा मुद्दा मिळाला. सरकारलाही दोषाचे धनी व्हावे लागले आणि सरकार व विरोधकांतील विसंवादाचा लाभ अन्य घटकांना घेता आला. अनेकांची दिशाभूल केली गेली आणि त्यामुळे समाजात अस्वस्थताही निर्माण झाली. आता किमान हे टाळता येणार आहे. संयुक्त समितीही एक मिनी पार्लमेंटच असते. त्यामुळे त्यांच्यात सहमती होईल की नाही याची शाश्वती देता येत नाही. तथापि, त्यांनी आपल्या विरोधाच्या दृष्टिकोनाला थोडे बाजूला ठेवून समाजहिताचा विचार करत निर्णय घ्यावा.

प्रबोधन

# स्वातंत्र्य मिळवा । सर्वार्थाने

१५ ऑगस्ट आणि २६ जानेवारी हे दोन जसे राष्ट्रीय महत्त्वाचे दिवस आहेत, तसाच २५ जुलै हा सबल महिला दिन म्हणून राष्ट्रीय महत्त्वाचा मानायला हरकत नाही. कारण या दिवशी पुरुषप्रधान संस्कृतीचा इतिहास खंडित करून एक महिला भारताच्या सर्वोच्चपदी आरूढ झाली आहे. इसवी सनाच्या तिसऱ्या सहस्रकाने पूर्वीच्या दोन हजार वर्षांचा इतिहास या दिवसाने खंडित केला. आणि भारतीय स्त्रीने दोन हजार वर्षांपूर्वी ज्या मुक्त लब्धप्रतिष्ठ, समताधिष्ठित जीवनाचा उन्मुक्त आनंद मनसोक्त उपभोगला तो काळ पुन्हा येण्याची वाट मोकळी करण्याचं काम या महान दिवसाने केलं आहे. 'भारतीय संस्कृती कोश' त्या सुदैवी स्त्रियांविषयी लिहितो, 'इसवी सनाच्या पहिल्या शतकापर्यंत भारतीय समाजात प्रौढविवाह रूढ होते. त्याकाळी कन्येचं उपनयन होई, तिला शिक्षणाचा लाभ घेता येत असे. वयाने आणि शिक्षणाने प्रौढ असलेल्या मोठ्या वयाच्या मुलीचा पती शिक्षित, सुसंस्कृत म्हणजेच योग्य जोडीदार असे.' पण भारतीय स्त्रीजीवनावर इसवी सनाच्या पहिल्या शतकात रचल्या गेलेल्या मनुस्मृतीने आपला विषारी परिणाम शीघ्र गतीने करायला प्रारंभ केला आणि मुक्त स्त्रीजीवन बंदिवासात पडलं. स्त्रीद्वेष्ट्या मनूचा मध्यवर्ती विचार होता, 'ना स्त्रीस्वातंत्र्यमर्हति' अर्थात, स्त्री ही स्वतंत्र असूच नये! बाल्य संपण्याच्या आत तिचा विवाह करण्याची रूढी सुरू करून धर्मशास्त्रकारांनी स्त्रीजीवनाचा पुरता नाशच केला. म्हणूनच बालविवाहाबद्दल आपली नापसंती व्यक्त करताना लोकहितवादी देशमुख म्हणतात, 'आठ–नऊ वर्षे मुलीस झाली म्हणजे आईबापास काळजी पडते की, मुलीचे लग्न झाले पाहिजे. नाहीतर लोक आम्हास हसतील की पाहा, यानी आपली मुलगी केवढी वाढवली, पण अजून लग्न नाही!'
विवाहित स्त्रियांनी तर मनुस्मृती रोज सकाळी जाळावी इतके पक्षपाती, अन्याय्य नियम त्यात आहेत. उदाहरणार्थ, पती चारित्र्यहीन, दुर्गुणी व स्वैराचारी असला तरी साध्वी स्त्रीने नेहमी देवाप्रमाणे त्याची शुश्रूषा करावी. विधवा स्त्रीने तर मरावं, असंच त्यात म्हटलंय.
विधवा स्त्रीचा पुनर्विवाह ही एक सामाजिक गरज असताना तिच्याकडे पूर्ण दुर्लक्ष करून, नव्हे तिच्या विरोधात मनुस्मृतीचं म्हणणं म्हणून प्रथम ब्राह्मणांनी आणि त्यानंतर अंधानुकरण करणाऱ्या क्षत्रिय–मराठा आदी जातींनी पुनर्विवाहबंदी करून स्त्रियांना अपमानास्पद जीणं भोगायला लावलं, काही मूर्ख घराण्यांनी तर पडदाप्रथा सुरू करून स्त्रीचं सामाजिक जीवनच नष्ट केलं. समाजात स्त्रीधमार्ची हाकाटी सुरू झाली. त्यामुळे 'स्त्री–पुरुष तुलना' ह्या चिंतन परिप्लुत, विद्रोही निबंधाच्या ओजस्वी लेखिका ताराबाई शिंदे म्हणतात, 'स्त्रीधर्म म्हणजे काय? निरंतर पतीची आज्ञा पाळणे, त्यांचे मर्जीप्रमाणे वागणे, त्यानी लाथा मारिल्या, शिव्या दिल्या, दुसऱ्या रांडा ठेविल्या, नवरुजी दारू पिऊन, जुवा खेळून वा कोणाचा प्राण घेऊन आले तरी स्त्रियांनी त्याची परमात्म्यासारखी पूजा करावी, त्याच्या सेवेत हजर राहावे, हा स्त्रीधर्म!' ताराबाईचं हे म्हणणं दीडशे वर्षांपूर्वीचं आहे. ताराबाईनी आपल्या या निबंधाच्या अर्ध्या भागात पुरुषदुर्गुणमीमांसा केली आहे.
पुरुषी अहंकाराचं वर्णन प्राचार्य भोसले पुढीलप्रमाणे करतात, 'स्त्री फार मागे राहिली तरी ते पुरुषांना आवडत नाही. ती फार पुढे आली, तरी ते रुचत नाही. तिला बरोबर कधी राहू दिलं जात नाही, तरी ती सतत जवळपास राहते (व लागते.)'
पण आता परिस्थिती बदलत आहे. स्त्रिया मानसिक आणि सामाजिकदृष्ट्या सबल होत आहेत. स्वातंत्र्य दिनाच्या आनंदात आता स्त्रियांनी आपल्याही स्वातंत्र्याचा आग्रह व्यक्त करायला हवा; दाखवायला हवा. कारण–

राष्ट्रपतीपदी । बैसली महिला
नव्या संस्कृतीला । वंदा, चला ॥१
मनूचे पुतळे आता काढावेत
टाका कचऱ्यात फोडूनिया ॥ २
गाढवावरती । मनुस्मृती ठेवा
धिंड न्यावी गावा । छोट्या–मोठ्या ॥ ३
स्त्रियांनो आपल्या । शक्तीला जागवा
स्वातंत्र्य मिळवा । सर्वार्थाने ॥४
सौभाग्याची चिन्हे दूर फेकावीत
का हो गुलामीत । सुख वाटे ॥५
नको पतीसाठी । उपास–तापास
वडाच्या झाडास । सूत नको ॥६
सीता–द्रौपदीचा । आदर्श टाकावा
सन्मान जपावा । स्वतःचाच ॥७
देश आहे तुमचा । तसाच पुरुषांचा
साथीने प्रगतीचा । रथ ओढा ॥ ८



प्रा. डॉ. जे. बी. शिंदे

प्रबोधन

# स्वतंत्र्याचे स्तोत्र । सदा आळवावे

स्वराज्याशिवाय सु–राज्य अस्तित्वात येऊच शकत नाही. म्हणजेच सुराज्य हे साध्य आहे आणि स्वराज्य हे केवळ साधन आहे. आपलं स्वातंत्र्य किती बेगडी, खोटं आहे, ते स्पष्ट करताना विचारवंत प्राचार्य शिवाजीराव भोसले म्हणतात, 'भारत स्वतंत्र झाला हा इतिहास आहे. पण त्याच्या प्रकृतीत स्व–राज्य या जाणिवेचा प्रवेश घडला नाही. जागृत, मुक्त, उन्नत, कार्यरत, निष्कलंक लोकमानस हा स्वराज्याचा आत्मा आहे. मात्र स्वातंत्र्याच्या कुडीत अजून त्याचा प्रवेश घडला नाही.' भारतीय स्वातंत्र्य जोपर्यंत सर्वसामान्य समाजाला जगण्याचं स्वातंत्र्य अन्न, वस्त्र, निवाऱ्याच्या रूपाने देत नाही, तोपर्यंत ते निर्जीव, निर्बीज, पोकळ, अचेतन, निरुपयोगी, टाकाऊ, घृणास्पद वाटणार यात शंका नाही. थोर क्रांतिवीर लेनिन म्हणतात, 'भुकेलेल्या समाजाचं राजकीय स्वातंत्र्याने कधीही समाधान होणार नाही!' भारताच्या बहुसंख्य जनतेला ज्या राजकीय स्वातंत्र्याने पोकळ आश्वासनांशिवाय काही दिलेलंच नसेल, तर स्वातंत्र्यदिनाविषयी त्यांना आस्था, जागृती, आनंद कसा वाटणं शक्य आहे? विचारवंत सिसेरो म्हणाले, 'सत्तेतील सहभाग म्हणजे स्वातंत्र्य!' पण भारताची आजची लोकशाही चलाख, धूर्त, टोळीवाल्या पक्षांनी बळकावलेली तरी आहे किंवा ती धर्मलंडांच्या भ्रमिष्ट वक्तव्यातून आणि कृतीतून तरी जन्मली आहे.' त्यामुळेच लोकपाल बिल जनतेच्या संसदेत मान्य होतं. पण विशेषाधिकारभोगी सभेत ते अमान्य होतं. ही घटनेतील खिंडारं स्वातंत्र्यघातकी उंदीर, घुशींची आश्रयस्थानं आहेत. ती भारतमंदिराचा पाया उकरून विध्वंस घडवणार यात शंका नाही!
राज्यघटनेने अज्ञानी, दरिद्री, जनतेला उदंड स्वातंत्र्य बहाल केली, पण ती बोलाचीच कढी, बोलाचीच भात । जेवूनिया तृप्त कोण झाला? ह्या संत तुकोबांच्या वचनाप्रमाणे व्यर्थ आहेत. आंधळ्या–पांगळ्यांना संचार स्वातंत्र्य, अक्षरशत्रूंना– अज्ञानी प्रजेला भाषणस्वातंत्र्य, हाती दमडी नसलेल्यांना आणि मेंदू शून्यवत असणाऱ्यांना व्यवसाय स्वातंत्र्य देऊन काय फायदा? अशा लोकांचा विचार करून थोर विचारवंत रुसो म्हणाले, 'प्रत्येक माणूस स्वतंत्र म्हणून जन्माला येतो, पण तो सर्वत्र बंधनातच अडकलेला आढळतो!' अशा अज्ञानापत्तीग्रस्तांना मार्गदर्शनाची सोय आपल्या स्वातंत्र्यप्राप्तीत आहे का? प्राचार्य शिवाजीराव भोसले म्हणाले, 'घटनेने नागरिकांना विचारस्वातंत्र्य दिलं, ते स्वतंत्र विचार करण्यासाठी! स्वतंत्र विचार हे स्वतंत्र भारताचं वैभव ठरावं.' पण हे वैभव भोगणे आजच्या सर्वसामान्य भारतीयांच्या आवाक्यात
आहे का? लोकशाही सिद्धान्तापैकी स्वातंत्र्याचा थोडा परिचय समाजाला आहे. पण समता व बंधुता मात्र वाऱ्यावर सोडल्याने स्वातंत्र्य उधळतं आणि ते अतिरेकी स्वातंत्र्य होतं. भारतीयांच्या वाट्याला हे अतिरेकी स्वातंत्र्य आलं असून त्याचे आधारस्तंभ आहेत–गाळीव नेते आणि पाळीव अनुयायी! यांच्या गुलामीतून देशाला सोडवणं, आता कोणत्याही 'नंबरी' बापूजींना शक्य नाही. भारतीय संस्कृतीच्या नावाने गळा काढणाऱ्या टोळभैरवांनी तर स्वातंत्र्याला स्वैराचाराचंच रूप दिलं आहे. त्यांनी संस्कृतीज्ञानाचे पितामह सानेगुरुजी काय म्हणतात हे समजून घ्यावं. सानेगुरुजी म्हणतात, 'खरी संस्कृती सर्वांच्या जीवनाचे मूलभूत प्रश्न सोडवण्यात आहे. एखाद्या धर्माच्या नावे संघटना स्थापन करून प्रश्न सुटत नसतात. म्हणून धर्म, संस्कृती या पोकळ शब्दांनी कोणी विचलित होऊ नये.' प्राचार्य पी.बी.पाटील भारतीय स्वातंत्र्याच्या मुळावर उठलेल्या विचार–व्यवहारावर परखडपणे लिहितात, 'आधुनिक भारताच्या उभारणीत लोकमताला मंत्रासारखं सामर्थ्य आहे आणि हे लोकमतच भ्रमिष्ट करण्यात ब्राह्मण धमार्चा कोणी हात धरू शकत नाही!' भारतीय स्वातंत्र्यांच्या दुर्दैवाचे दशावतार सांगताना कट्टर समतावादी नेते भाई बागल म्हणतात, 'शेठजी आणि भटजी यांच्या तावडीत सापडलेला हा देश खऱ्या स्वातंत्र्याची स्वप्नं पूर्वीही पाहू शकला नव्हता आणि भविष्यकाळीही कधी पाहू शकेल, असं
वाटत नाही!'
भटजी मानसिक गुलामगिरी लादतो आणि शेटजी आर्थिक गुलामगिरीत समाजाला ठेवतो. एकूण सांस्कृतिक आणि सामाजिक अशा दोन पदरी गुलामगिरीत आपला देश त्रस्त झालेला असताना आधुनिक काळात बडी राष्ट्र आणि बड्या कंपन्याही आपापली बंधनं लादून नाममात्र राहिलेलं स्वातंत्र्य नामशेष करीत आहेत. भ्रमिष्ट मेंदू आणि भणंग खिशाने आपण जयोस्तुते श्रीमहन्मंगले हे स्वातंत्र्याचं स्तोत्र गाणार कसे? अशा वेळी स्वातंत्र्याचा प्रारंभ मुळातून करावा लागेल. महाभारतातील शरपंजरी भीष्म धर्मराजाला म्हणतात, 'धर्मा, तुझं राज्य नीट चालायला हवं असेल, तर गरिबांची धन कर, श्रीमंतांची भर करू नकोस!' पितामह भीष्माचार्यांचा उपदेश नेत्याजेत्यांनी आचरणात आणला, तर भारत स्वातंत्र्याचा उपयोग घेऊ शकेल. त्यासाठी लक्षात असू द्या–

गुलामाला नाही । स्वप्नातही सुख
कुचंबणा दुःख । खूप होते ॥ १
आर्थिक गुलामी । धार्मिक गुलामी
बौद्धिक गुलामी । दूर करा ॥२
अज्ञानात खरी । गुलामी असते
ज्ञान पंख देते । माणसाला ॥३
बुद्धीने जगावे । बंधमुक्त जिणे
स्वातंत्र्याचे गाणे । तेव्हा गावे ॥४
बुद्धीने सुखाचे । जगावे जीवन
धन आणि मान । खूप लाभे ॥५
धमार्ची बंधने । झाली कालबाह्य
बुद्धीने सुसह्य । करा उठा ॥६
शहाणा माणूस । मालक न होतो
दास न करतो । कोणालाही ॥७
स्वातंत्र्याचे स्तोत्र । सदा आळवावे
जगा सुख द्यावे । मुक्तहस्ते ॥८



प्रा. डॉ. जे. बी. शिंदे

# फौजी.. शौर्य आणि संघर्षाची गाथा

## 'फौजी' मराठी चित्रपट ३० ऑगस्टला राज्यभरात प्रदर्शित होणार

**मुंबई (कटूसत्य वृत्त):–** स्वातंत्र्याचा उत्सव आपल्याला सैनिकांनी देशासाठी दिलेल्या शौर्य आणि बलिदानाची आठवण करून देतो. आपल्या स्वातंत्र्याचा यंदाचा हा उत्सव द्विगुणित करण्यासाठी मातृपितृ फिल्म्स निर्मित घनशाम येडे प्रस्तुत 'फौजी' हा मराठी चित्रपट येत्या ३० ऑगस्टला चित्रपटगृहात दाखल होत आहे. शूरवीरांचा मोठा वारसा आपल्याला लाभलेला आहे. आपले प्राण तळहातावर घेऊन देशाच्या रक्षणासाठी सीमेवर सुसज्ज असणाऱ्या जवानांमुळेच आपण सुरक्षित आहोत. सीमेवरच्या जवानांची अंगावर काटा आणणारी शौर्यकथा पोटतिडकीने मांडत, चैतन्य मराठे, भारत देशमुख या दोन जवानाचं आयुष्य आणि त्यांची निस्सीम देशसेवा यांच्यावर 'फौजी' चित्रपटातून प्रकाशझोत टाकण्यात आला आहे.




सौरभ गोखले, प्राजक्ता गायकवाड, अरुण नलावडे, नागेश भोसले, संजय खापरे, अश्विनी कासार, शाहबाज खान, टिनू वर्मा, सिद्धेश्वर झाडबुके, हंसराज जगताप, विवेक चाबुकस्वार सुनील गोडबोले, रोहित चव्हाण, प्रग्या नयन, जान्हवी व्यास, कल्याणी नदकिशोर, मंजुषा खत्री, जयंत सावरकर, घनशाम येडे हे कलाकार चित्रपटात आहेत. आपल्या देशासाठी, समाजासाठी आपला प्राण पणाला लावणाऱ्या जवानांप्रती कृतज्ञता व्यक्त करणे अत्यंत गरजेचे आहे. त्यासोबतच युवा पिढीला देशासाठी सर्वस्व अर्पण करण्याची प्रेरणा मिळावी यासाठी 'फौजी' चित्रपटाची निर्मीती केल्याचे चित्रपटाचे निमार्ते–लेखक–दिग्दर्शक घनशाम विष्णुपंत येडे यांनी सांगितले.

या चित्रपटाच्या सहनिर्मात्या सौ.स्वप्नजा विश्वनाथ नाथ आहेत. विशेष कार्यकारी निमार्ता प्रथमेश बिल्डर्स अँड डेवलोपर्स, शिवाजी घमाजी दडस तर विशेष निर्मिती सहकार्य विष्णुपंतभाऊ नेवाळे यांचे आहे. अनमोल निर्मिती सहकार्य सतीश नाझरकर, डॉ.शंकर तलबे,उद्धव गावडे, अशोक गाढे, राजेश चव्हाण, गणेश गुंजाळ, एस. पी.गावडे, ज्योतीराम घाडगे, कुमार परदेशीं, राजेंद्र कर्णे यांचे आहे.

शेतकरी कुटुंबातून आलेल्या आणि स्पॉटबॉय ते निर्माता–दिग्दर्शक असा संघर्षमय प्रवास करणाऱ्या घनशाम येडे यांनी 'फौजी' चित्रपटाची निर्मिती केली आहे. चित्रपटाची कथा, पटकथा, संवाद, गीते घनशाम येडे यांची आहेत. छायांकन मोहन वर्मा, तर संकलन विश्वजीत यांचे आहे. साहसदृश्ये मोजेस फर्नांडिस यांची आहेत. संगीत राजेश बामुगडे, बाबा चव्हाण, सूरज कुमार तर पार्श्वसंगीत उमेश रावराणे, सूरज कुमार यांचे आहे. शान, वैशाली माडे, उर्मिला धनगर, कविता राम यांनी चित्रपटातील गाण्यांना स्वरसाज दिला आहे. ध्वनी अनिल निकम तर कलादिग्दर्शनाची जबाबदारी वासू पाटील, कौशल सिंग यांनी सांभाळली आहे. रंगभूषा आमोद दोषी तर वेशभूषा नाशीर खान यांची आहे. निर्मिती प्रमुख महेश चाबुकस्वार तर वितरणाची जबाबदारी ए.ए फिल्म्सने सांभाळली आहे.

# प्रा.डॉ.तुकाराम म्हमाणे पुणे आयोजित २०२४ रसायनशास्त्र विषयात सेट परीक्षा उत्तीर्ण

**अनगर (कटूसत्य वृत्त):–** येथील बाबूराव पाटील कला व शास्त्र महाविद्यालया तुकाराम म्हमाणे महाविद्याल तील रसायनशास्त्राचे प्रा. डॉ. तुकाराम म्हमाणे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे आयोजित २०२४ रसायनशास्त्र विषयात सेट परीक्षा उत्तीर्ण झाले. यापूर्वी त्यांनी रसायनशास्त्र विषयात सीएसआयआर–आयआयसीटी हैदराबाद येथे केंद्र शासनाची फेलोशीप मिळवून पीएच. डी. संपादन केली. तसेच ते नेट जेआरएफ ही परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत. ते शेतकरी कुटुंबातील असून, मुळचे वडाचीवाडी (ता.



मोहोळ) गावचे रहिवासी आहेत. त्यांच्या या माजी आमदार राजन पाटील, संस्थाध्यक्ष विक्रांत पाटील, सचिव तथा सिनेट अजिंक्यराणा पाटील, सदस्य संस्थेचे पदाधिकारी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत सुर्यवंशी,सचिव गणेश पावले विविध शाखेचे मुख्याध्यापक, प्राध्यापक, शिक्षक व प्रशासकीय कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

# सार्वजनिक उत्सव, गणेश उत्सव साजरे करण्यासाठी ऑनलाइन द्वारे तात्पुरती परवानगी घेण्याचे आवाहन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** सार्वजनिक कार्य, उत्सव, गणोशोत्सव व इतर जयंती आणि उत्सव इत्यादी साजरे करण्यासाठी या कार्यालयात नोंदणीकृत नसलेले मंडळ, संस्था, उत्सव, कमिट्या, जनतेकडून देणगी, वर्गणी रूपाने गोळा करीत असतात, सार्वजनिक कार्य, उत्सव करणाऱ्या या संस्था,मंडळे, उत्सव, समित्या यांनी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, 1950 च्या कलम 41 क अन्वये धमार्दाय उप आयुक्त कार्यालय, सोलापूर विभाग सोलापूर यांचे कार्यालयात ऑनलाईन पध्दतीने विहित नमुन्यात कळविणे बंधनकारक आहे.

याप्रमाणे संबंधितांना ऑनलाईन पध्दतीने तात्पुरती परवानगी मिळू शकेल. आवश्यक तात्पुरती परवानगी न घेतल्यास वर नमूद अधिनियमाच्या कलम 67 अन्वये गुन्हा ठरतो. धमार्दाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे परिपत्रक क्र 466 नुसार ऑनलाईन अर्ज भरण्याची प्रक्रिया https://charity.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

अर्ज भरण्याची माहिती संकेत स्थळावरील प्रणाली मार्गदर्शक या टॅब च्या अंतर्गत 41 (क) परवानगी मध्ये सविस्तर उपलब्ध आहे. अर्ज भरण्यासाठी पुढील प्रमाणे कागदपत्रे ऑनलाईन अपलोड करणे आवश्यक राहतील.1. अध्यक्ष व सचिव यांचे पॅनकार्ड तसेच ओळखपत्रे (आधारकार्ड/निवडणूक कार्ड/ वाहन चालक परवाना), 2. मागील वषार्चे हिशोब (उत्सवाचा खर्च रू.5 हजार पेक्षा जास्त असल्या सनदी लेखापालाकडून तयार करून घ्यावेत.), 3. या कार्यालयामार्फत मागील वर्षी देण्यात आलेल्या तात्पुरती परवानगीची प्रत, 4. या वषार्पासून नव्याने कार्य उत्सव साजरे करीत असल्यास नगरपालिका हद्दीतील मंडळांनी त्यांचे भागातील नगरसेवकाचे (प्रथम वर्ष उत्सव साजरा करीत असले बाबतचे) शिफारसपत्र व ग्रामीण भागातील असल्यास संबंधित ग्रामपंचायतीचे वरील आशयाचे शिफारसपत्र आवश्यक आहे याची नोंद घ्यावी.

वात्रटिका

## ब्रेकिंग न्यूज

राजकीय वतुर्ळात
रोज वावटळ सुटते...
तेच खरे शहाणे आणि
बाकीचे बावळट वाटते...
सुत्र तयारच असतात
लगेच बातमी द्यायला...
आणि बातमी सांगणारे
मसाला लावायला...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

# सहा वर्षीय यशवर्धन करणार दोन्ही हाताने दोन लाठी फिरवण्याचा विक्रम

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने 15 ऑगस्ट रोजी सहा वर्षीय विद्यार्थी यशवर्धन सतीश रेब्बा हा 78 मिनिट म्हणजेच सलग सव्वा तास दोन्ही हाताने दोन लाठी फिरवण्याचा विक्रम करणार आहे, अशी माहिती सोलापूर शहर – जिल्हा लाठी असोसिएशनचे सचिव अश्विन कडलासकर यांनी पत्रकार परिषदेत दिली. युनिकॉर्न बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये याची नोंद होणार आहे. सोलापूर शहर – जिल्हा लाठी असोसिएशन व पद्मशाली समाज संचलित नारायणराव कुचन प्रशाला यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम होणार आहे. 15 ऑगस्ट रोजी सकाळी दहा वाजता राजेंद्र चौक येथील बुर्ला महाविद्यालयात या उपक्रमास सुरुवात होणार आहे. प्रमुख पाहुणे म्हणून संघटनेचे संचालक म. रफी शेख, उपाध्यक्ष शिवराम भोसले, सचिव अश्विन कडलासकर, अंजना कडलासकर यांची उपस्थिती राहणार आहे. यशवर्धन हा गेल्या दोन महिन्यापासून सराव करीत आहे. संघटनेचे उपाध्यक्ष शिवराम भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली त्याने आतापर्यंत राष्ट्रीय, राज्यस्तरीय व एशियन लाठी स्पर्धेमध्ये यश मिळविले आहे. या पत्रकार परिषदेस शिवराम भोसले, यशवर्धन रेब्बा, पुनम रेब्बा, दिलीप गुल्लापल्ली आदी उपस्थित होते.

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स (0217)2605091 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone-0217-2605091 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# सर्वोच्च न्यायालयाचा UGC-NET परीक्षा पुढे ढकलण्याच्या प्रकरणावर सुनावणीस नकार

**दिल्ली (वृत्त सेवा):-** न्यायालयाने आज UGC-NET परीक्षा पुन्हा घेण्याच्या निर्णयाला आव्हान देणारी याचिका फेटाळली आहे. याचिकाकर्त्यांनी १८ जून रोजी घेण्यात आलेली यूजीसी-नेट परीक्षा रद्द करून परीक्षा पुन्हा घेण्याच्या निर्णयाला आव्हान दिले होते.



यासंदर्भात दाखल करण्यात आलेल्या याचिकेवर सुनावणी करण्यास सर्वोच्च न्यायालयाने नकार दिला. दरम्यान, न्यायालयाच्या निर्णयानुसार 21 ऑगस्ट रोजी पुन्हा UGC-NET परीक्षा होणार आहे.

मुख्य न्यायमूर्ती डीवाय चंद्रचूड यांनी या याचिकेवर सुनावणी केली. त्यांनी यावेळी, '9 लाख लोक परीक्षा देणार आहेत. त्यांना अनिश्चिततेत सोडले जाऊ शकत नाही.' असे म्हटले. जूनमध्ये घेण्यात आलेली परीक्षा रद्द करण्यात आल्याचे काही विद्यार्थ्यांनी सांगितले. त्याची सीबीआय चौकशी सुरू आहे. अशा परिस्थितीत जोपर्यंत सीबीआयचा तपास सुरू आहे, तोपर्यंत विद्यार्थ्यांच्या परीक्षा घेऊ नयेत. यूजीसी नेट परीक्षा 18 जून रोजी घेण्यात आली होती, परंतु परीक्षेतील गैरप्रकारांची माहिती सरकारला मिळाल्याने दुसऱ्याच दिवशी ती रद्द करण्यात आली.

मुख्य न्यायमूर्ती डीवाय चंद्रचूड, न्यायमूर्ती जेबी पाडीर्वाला आणि न्यायमूर्ती मनोज मिश्रा यांच्या खंडपीठाने, 'परीक्षा रद्द करून ती पुन्हा घेण्याच्या निर्णयाला दोन महिने उलटले आहेत. अशा परिस्थितीत याचिकेवर विचार केल्यास विद्यार्थ्यांमध्ये अनिश्चितता वाढेल आणि अराजकतेचे वातावरण निर्माण होईल.' असे नमूद केले.

सरन्यायाधीश पुढे म्हणाले, 'हे अंतिम होऊ द्या, आम्ही आदर्श जगात राहत नाही. 21 ऑगस्टला परीक्षा होऊ द्या, विद्यार्थ्यांसाठी निश्चितता असली पाहिजे.' खंडपीठाने सांगितले की 9 लाखांहून अधिक विद्यार्थी परीक्षेला बसले आहेत आणि केवळ 47 याचिकाकर्त्यांनी त्यास आव्हान दिले आहे.

दरम्यान, UGC-NET 2024 ची परीक्षा 18 जून रोजी झाली होती, ज्यामध्ये 9 लाखांहून अधिक उमेदवार बसले होते. शिक्षण मंत्रालयाने 19 जून रोजी परीक्षा रद्द केल्याची घोषणा केली. मंत्रालयाने सांगितले की, गृह मंत्रालयाच्या अखत्यारीतील नॅशनल सायबर क्राइम थ्रेट ॲनालिटिक्स युनिटच्या माध्यमातून परीक्षेत काही अनियमितता झाल्याची माहिती देण्यात आली होती, त्यानंतर ती रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानंतर हे प्रकरण तपासासाठी सीबीआयकडे सोपवण्यात आले.

# वावडी स्पर्धेत शिवतांडव, जाधव, गाडेकर प्रथम तर हिरकणीत अनुजा मगर ठरल्या सोन्याच्या नथीच्या मानकरी

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** वावडी व हिरकणी महोत्सव संयोजन समितीच्या वतीने रविवार दि 11 ऑगस्ट रोजी निमगाव येथे आयोजित करण्यात आलेल्या वावडी स्पर्धेत मोठ्या गटात शिवतांडव ग्रुप, मध्यम गटात तानाजी जाधव ग्रुप तर लहान गटात 65 फाटा गाडेकर ग्रुपने बाजी मारत प्रथम क्रमांकाची बक्षिसे जिंकली तर महिलांसाठी आयोजित करण्यात आलेल्या हिरकणी महोत्सवात अनुजा संकेत मगर या सोन्याच्या नथिच्या मानकरी ठरल्या प्रसिद्ध सिने अभिनेत्री माधुरी पवार यांच्या हस्ते सर्व बक्षीस विजेत्या संघांना व महिलांना बक्षीस वितरण करण्यात आले.



निमगावचा वावडी महोत्सव माझ्या माहितीनुसार बहुदा महाराष्ट्रातील हा एकमेव वावडी महोत्सव असेल या महोत्सवात सामाजिक संदेश देऊन तीस, तीस फूट उंचीच्या वावड्या बनविल्या जातात व त्या आकाशात उडविल्या जातात व ही परंपरा, कला जतन करण्याचे काम संयोजन समिती करीत आहे याबद्दल मनस्वी आनंद तर आहेच परंतु याचबरोबर ग्रामीण भागातील गोरगरीब, शेतमजूर महिलांनाही स्पर्धेच्या माध्यमातून व्यासपीठ उपलब्ध होत आहे याचा अभिमान वाटतो.

**– श्रीमंत कोकाटे,** इतिहास तज्ञ

यावेळी विचारपीठावर ज्येष्ठ साहित्यिक, लेखक, इतिहासतज्ञ श्रीमंत कोकाटे, मल्ल सम्राट रावसाहेब मगर, साहित्यिक हनुमंत पवार, वेळापूरचे सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक भाऊसाहेब गोसावी, वृषाली माने -पाटील, रेवती कदम आदी मान्यवर उपस्थित होते वावडी बनविणे व उडवणे हा खेळ मगराचे निमगाव या ठिकाणी श्रावण महिन्यात नागपंचमी निमित्त खेळला जातो अगदी 5 फुटापासून ते 30 फुटापर्यंत उंचीच्या वावड्या बनविल्या जातात व श्रावण महिन्यात नागपंचमीनिमित्त त्या आकाशात उंच उडविल्या जातात 200 वर्षापेक्षा जास्त कालावधीची ही परंपरा आहे सन 2024 च्या वावडी स्पर्धेत लहान गटात ओम मगर, डी बॉईज, श्रीराज मगर, विकास काळे तर मध्यम गटात शिवतेज मगर, अभिषेक जाधव, निलेश मगर, सुदर्शन पवार तर मोठ्या गटात तोरणे, होलार गल्ली, होय हिंदूच यांनी अनुक्रमे चतुर्थ, तृतीय व द्वितीय क्रमांकाची पारितोषिके मिळविली.

हिरकणी महोत्सवात टिफिन डबे छाया पाटील, संगीता कस्तुरे, आरशिया शेख, ऋतुजा मगर व जयदा शेख यांनी मिळविले तर हिरकणी कुकर कावेरी कदम, प्राजक्ता बांदल, प्रतिभा पाटील, मयुरी मगर यांनी पटकविले तर चांदीचे पैंजण वषाराणी मगर व ज्योती मगर यांनी मिळविले कार्यक्रमाच्या सुरुवातीस प्रसिद्ध सिने अभिनेत्री माधुरी पवार यांचा सन्मान संयोजन समितीचे जेष्ठ सदस्य बाळासाहेब मगर व कल्पना मगर यांच्या हस्ते करण्यात आला या स्पधेर्साठी पुणे, सातारा, सांगली सोलापूर आदि जिल्ह्यातून कला क्रीडा, कृषी, उद्योग, वैद्यकीय, कृषी आदी क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थिती लावली होती यावेळी सिने अभिनेत्री माधुरी पवार यांनी आपल्या अदाकारीने उपस्थित महिला भगिनींसह सर्वांनाच मंत्रमुग्ध केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रामचंद्र आसबे तर आभार भारत मगर गुरुजी यांनी मानले कार्यक्रमासाठी वावडी व हिरकणी महोत्सव संयोजन समितीच्या सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# स्वातंत्र्य क्रांतीच्या सुरेल जयघोषात जिजामाता कन्या प्रशालेत समुहगीत गायन स्पर्धा संपन्न

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** जुलमी ब्रिटिश राजवटीत पिळवटून निघालेल्या भारतीयांच्या असंतोषाचा भडका ८ ऑगस्ट १९४२ रोजी ऑगस्ट क्रांती मैदान मुंबई येथे उडाला. गांधीजींनी "छोडो भारत"ची हाक दिली आणि देशात क्रांतीची लाट आली. म्हणूनच या ऐतिहासिक दिनाच्या स्मरणार्थ जिजामाता कन्या प्रशालला व कनिष्ठ महाविद्यालयात समुहगीत गायन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.



प्रशालेच्या स्थानिक व्यवस्थापन समितीच्या सभापती सौ. सुलक्षणादेवी जयसिंह मोहिते पाटील व रत्नाई संकुलाच्या मार्गदर्शक कु.स्वरूपाराणी जयसिंह मोहिते पाटील यांच्या मार्गदर्शनानुसार या स्पधेर्चे आयोजन करण्यात आले.

विद्यार्थिनींच्या जिजाऊ, ताराराणी, सावित्रीबाई आणि अहिल्यादेवी या चार गटांमध्ये ही स्पर्धा घेण्यात आली. विद्यार्थिनींनी हे राष्ट्र देवतांचे,जयोस्तुते जयोस्तुते, उठा राष्ट्रवीरहो, हा देश माझा याचे भान जरासे राहू द्या रे, देश रंगीला, संदेसे आते है, वो देश मेरे, ये मेरे वतन के लोगो अशी एकापेक्षा एक रोमहर्षक देशभक्तीपर समुहगीते सादर केली आणि संपूर्ण वातावरणात राष्ट्रभावना जागविली.

या कार्यक्रमाची सुरुवात शिक्षण प्रसारक मंडळ अकलूजचे संस्थापक कै.सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील व अक्कासाहेब यांच्या प्रतिमांचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर अमर जवान ज्योतीच्या प्रतिमेस पुष्पचक्र अर्पण करण्यात आले प्रशालेचे संगीतशिक्षक शेलार सर व रत्नाई वाद्यवृंदातील विद्यार्थ्यिनींनी बहारदार स्वागतगीत सादर केले.


या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रशालेच्या मुख्याध्यापिका सुनीता वाघ यांनी केले. कार्यक्रमाचे परीक्षण संगीत क्षेत्रातील जाणकार डॉ.मंगेश शिंदे आणि सुनील कांबळे यांनी केले. स्पर्धेत मराठी गीतांमध्ये प्रथम क्रमांक ताराराणी गटाच्या 'उठा राष्ट्रवीरहो' या गीताला मिळाला.तर द्वितीय आणि तृतीय क्रमांक अनुक्रमे अहिल्यादेवी आणि सावित्रीबाई या गटांच्या 'जयोस्तुते' आणि 'हे राष्ट्र देवतांचे' या गीतांना मिळाला तर हिंदी गीतांमधे प्रथम क्रमांक अहिल्यादेवी गटाच्या 'संदेशे आते है' या गीताला तर द्वितीय आणि तृतीय क्रमांक अनुक्रमे जिजाऊ आणि सावित्रीबाई गटाच्या 'ऐ मेरे वतन के लोगो' आणि ' देस रंगीला रंगीला' या गीतांना मिळाला. यावेळी प्रमुख अतिथी वाहन निरीक्षक अश्विनी जगताप यांनी या कार्यक्रमाचे मनापासून कौतुक केले. विद्यार्थिनींनी ड्रेपरीपासून, संगीत, वादन, गायन आदि सर्वच बाबतीत अत्यंत बारकाईने तयारी करून उत्कृष्ट सादरीकरण केले. जीवनाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी कलेचे अनन्य साधारण महत्त्व असून विद्यार्थिनींना या सर्व उपक्रमांचा आयुष्यात दुरगामी लाभ होणार आहे असेही त्या पुढे म्हणाल्या. या कार्यक्रमला प्रशालेच्या स्थानिक व्यवस्थापन समिती सदस्या सौ नयना शहा यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषविले. याप्रसंगी सौ मनीषा चव्हाण, स.पो.नि. किरण पावसे, शिवाजी कांबळे आदी मान्यवरांसह पालक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन पी.पी.भोसले आणि सौ.एस. जी.खराडे यांनी केले.आभार प्रदर्शन प्रशालेचे पर्यवेक्षक वाय. के.माने देशमुख यांनी केले. परिक्षक डॉ.मंगेश शिंदे यांनी याप्रसंगी देशभक्तीपर अप्रतिम गायन सादर केले.शेवटी 'सारे जहाँ से अच्छा' या देशभक्तीपर गीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

# भगवान नगर येथील नागरिक पित आहेत मैला मिश्रित पाणी

## नागरिक त्रस्त प्रशासन सुस्त- नरसय्या आडम मास्तर

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर पोलीस मुख्यालय शेजारी असलेली भगवान नगर झोपडपट्टीचे 2016 साली जवाहरलाल नेहरू नागरी पुनरुत्थान योजना अंतर्गत पुनर्वसन करून पक्की घरे लाभार्थ्यांना हस्तांतरीत करण्यात आले.परंतु याठिकाणी मलनिस्सारण व्यवस्था योग्य व अचूक पद्धतीने न केल्यामुळे पिण्याचे पाणी नळ जोडणी व ड्रेनिज यांचे मिश्रित होऊन गढूण पाणी व ड्रेनिज याचे पाणी यात फरक दिसत नाही. मलनिस्सारण व पाणी जलवाहिनी फुटल्याने रोगराई पसरली आहे. ज्या दिवशी पाणी सोडले जाते त्यावेळी संपूर्ण वस्तीत नदीला पूर आल्यासारखी परिस्थिती निर्माण होते.यामुळे प्रत्येक घरात एक डेंग्यू,मलेरिया, हिवताप, हगवण, थंडी तापेचा रुग्ण आधळून येतो. याबाबत वारंवार विभागीय अधिकारी कार्यालय यांच्याकडे तक्रार करूनही दखल घेतली जात नाही. हे अत्यंत गंभीर आहे. नागरिक त्रस्त आणि प्रशासन सुस्त असल्याची टीका ज्येष्ठ नेते माजी आमदार कॉ.नरसय्या आडम मास्तर यांनी केली.





भगवान नगर येथील नागरिकांच्या वतीने सोलापूर महानगरपालिका आयुक्त शीतल तेली – उगले यांना ज्येष्ठ नेते माजी आमदार कॉ.नरसय्या आडम मास्तर यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाद्वारे निवेदन देण्यात आले. यावेळी या शिष्टमंडळात माजी नगरसेविका नसीमा शेख, ॲड.अनिल वासम, वंदना भिसे, योगेश मार्गम, अंबादास बिंगी, आनंद कळसकर, मल्लेशम अल्ली, प्रशांत म्याकल, रवि केंचुगुंडी आदींची रेणुका गुंडला, सरस्वती कमुर्ती उपस्थिती होती.

यावेळी माजी नगरसेविका नसीमा शेख यांनी सादर समस्या बाबत आयुक्त यांनी थेट हस्तक्षेप करून भगवान नगर येथील ड्रेनिज तातडीने दुरुस्ती करून पिण्याचे पाणी जलवाहिनी व मलनिस्सारण वाहिनी या दोन स्वतंत्र लाईन करणे अत्यावश्यक आहे. कृपया नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे व अनिवार्य समस्या आहे. वस्तुस्थिती लक्षात घेऊन तातडीने पुढील कार्यवाही करण्याचे आदेश देण्यात यावे अशा आशयाचे निवेदन नागरिकांच्या वतीने दिले.

# सोलापूर जिल्ह्यातील जलशक्ती अभियान 2024 या योजने विषयी आढावा बैठक संपन्न

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जलशक्ति अभियान 'नारी शक्ति से जलशक्ति' व अमृत सरोवर योजना या विषयांनबाबत आज दिनांक 12 ऑगस्ट 2024 दुपारी 12.30 मिनिटांनी राकेश कुमार मीना केंद्रीय नोडल अधिकारी जलशक्ती अभियान 2024 व श्रीमती पूर्णिमा बारहाते केंद्रीय तांत्रिक अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर येथे सोलापूर जिल्ह्यातील जलशक्ती अभियान 2024 या योजने विषयी सर्व विभागाच्या अधिकारी यांचे समावेत आढावा बैठक संपन्न झाली.या बैठकीस जलशक्ती अभियान या योजनेचे जिल्ह्याचे सदस्य सचिव, दयासागर यो.दामा व जलशक्ती अभियान योजनेतील जिल्हास्तरीय समितीचे सर्व सदस्य सदर बैठकीस उपस्थित होते. या बैठकीत माननीय अध्यक्ष महोदय यांनी सोलापूर जिल्ह्याच्या जलशक्ती अभियान 2024 या योजनेचे जिल्ह्याचे शास्त्रीय कृती आराखडा तयार करण्याच्या सूचना दिल्या. या आराखड्यामध्ये सर्व विभागांना आपल्या स्तरावरील कामे समावेश करण्याबाबत सूचना दिल्या. जलशक्ती अभियानामध्ये विभागांमार्फत



घेण्यात आलेल्या कामांची सविस्तर माहिती स्लाइड्स सादरी करणा द्वारे मा. अध्यक्ष महोदय यांनी करून घेतली व इतर नवीन कामे या आराखड्यामध्ये समावेश करण्याबाबत सूचनाही दिले.

तसेच या योजनेअंतर्गत पूर्ण करण्यात आलेल्या व प्रगतीपथावर असलेल्या कामांच्या क्षेत्रीय स्थळी प्रत्यक्ष पाहणी दि 13.08.2024 व 14.08.2024 या दोन दिवसात करणार असल्याबाबतचे त्यांनी सर्व जिल्हास्तरीय सदस्यांना सांगितले.

मृद व जलसंधारण विभागामार्फत या योजनेअंतर्गत विविध जलसाठ्यातील गाळ काढण्याची कामे,नाला खोलीकरणाची कामे, सिमेंट नाला बंधारे, शेततळे, इ. कामे घेण्यात आलेले असलेबाबत जिल्हा जलसंधारण अधिकारी द.यो.दामा यांनी स्लाइड्स द्वारे सादरी करण केले. लघु पाटबंधारे विभाग, (जि.प.) सोलापूर या विभागामार्फत बंधाऱ्यांचे दुरुस्तीची कामे या योजनेअंतर्गत घेण्यात आले असले बाबत एस. एस. पारसे, जिल्हा जलसंधारण अधिकारी, जिल्हा परिषद (ल.पा.) विभाग सोलापूर यांनी ppt द्वारे सादरी करण केले.

कृषी विभागामार्फत कंपार्टमेंट बंडिंग ची कामे, सिमेंट नाला बंधारे ही कामे या योजनेअंतर्गत घेण्यात आले बाबत सी. बी. मंगरुळे, कृषी विभागाचे प्रतिनिधी यांनी ppt द्वारे सादरी करण केले. सोलापूर महानगरपालिका या विभागाअंतर्गत विविध कार्यालयीन इमारतींचे रेन वॉटर हार्वेस्टिंगची कामे घेण्यात आले बाबत डंके, उपअभियंता सो.म.पा. यांनी स्लाइड्स द्वारे सादरी करण केले. भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, सोलापूर या विभागामार्फत रिचार्ज शाफ्ट ची कामे जलशक्ती अभियान 2024 योजनेअंतर्गत घेण्यात आलेली असलेबाबत मुस्ताक शेख, वरिष्ठ भूवैज्ञानिक यांनी ppt द्वारे सादरी करण केले. गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार या योजनेअंतर्गत सन 2024 मध्ये गाळ काढण्यात आलेल्या 65 कामांचा समावेश जलशक्ती अभियान 2024 या योजनेच्या कृती आराखड्यामध्ये समावेश करण्यात आलेले असले बाबत व या तलावांमधून 58.96 लक्ष घनमीटर इतका गाळ काढण्यात आलेले असले बाबत द.यो.दामा, जिल्हा जलसंधारण अधिकारी यांनी सांगितले. गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार या योजनेअंतर्गत गाळ काढण्यात आलेल्या तलावांच्या क्षेत्रीय स्थळी ही प्रत्यक्ष पाहणी करणार असलेबाबत राकेश कुमार मीना, केंद्रीय नोडल अधिकारी यांनी सांगितले. अध्यक्ष महोदय यांनी अमृत सरोवर अभियान या योजनेअंतर्गत पूर्ण करण्यात आलेल्या कामांचा आढावा घेतला. अमृत सरोवर अभियान या योजनेअंतर्गत सोलापूर जिल्ह्यातील मृद व जलसंधारण विभाग, लघु पाटबंधारे (जिल्हा परिषद) विभाग व भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण या विभागांनी एकूण 139 कामे पूर्ण केलेली असते बाबत द.यो. दामा, जिल्हा नोडल अधिकारी, अमृत सरोवर अभियान यांनी स्लाइड्स द्वारे सादरी करण केले. अमृत सरोवर अभियानांतर्गत पूर्ण करण्यात आलेल्या कामांच्या क्षेत्रीय स्थळी दरवर्षी दिनांक 15 ऑगस्ट व 26 जानेवारी या दिवशी ध्वजारोहण, वृक्षारोपण, स्वच्छता मोहीम तसेच इतर सार्वजनिक कार्यक्रम आयोजित करण्यात येत असल्याबाबत द. यो .दामा यांनी यावेळी सांगितले.

अध्यक्ष महोदय यांनी सर्व विभागांना या जलशक्ति अभियानाचा मूळ उद्देश व अभियान यशस्वीपणे राबविण्यात आले नंतर होणारे फायदे या विषय सविस्तर मार्गदर्शन केले. राज्यात पाणी टंचाई च्या यादीत सोलापूर जिल्हा कसे वगळण्यात येईल याबद्दल नियोजन करण्याचे सुचना दिल्या. महानगर पालिका अधिकारी डंके यांना स्त्री संघटनांचा या अभियानात जास्तीत जास्त सहभाग करून घेण्याचे निर्देश दिले.

'नारी शक्ति से जल शक्ति' 2024 च्या ब्रीदवाक्यनुसार जिल्हयात काम करावे. यासाठी सोलापूर महानगरपालिकेच्या स्वयं मदत संघटना ची मदत घेऊन या अभियाना विषयी जनजागृती करण्याच्या सुचना देण्यात आल्या. जिल्ह्याचे शास्त्रीय कृती आराखडा तयार करण्याच्या सूचना दिल्या.

अध्यक्ष महोदय यांनी त्यांच्या पुढील दोऱ्या पर्यंत सर्व विभागांनी सहभाग देऊन, जलशक्ति अभियान यशस्वी करण्याचे निर्देश दिले. सदस्य सचिव दयासागर यो.दामा यांनी सर्वांच्या वतीने अभियान यशस्वी करण्यात येईल अशी ग्वाही दिली. व सर्वांचे बैठकीला उपस्थित असलेबाबत आभार व्यक्त करून बैठक संपल्याचे जाहीर केले. त्यानंतर मा. अध्यक्ष महोदय यांनी सोलापूर जिल्ह्याचे स्थापित केलेल्या जलशक्ति केंद्राची पाहणी करून जलशक्ति केंद्र अजून बळकट करून अद्यावत करावे. जलशक्ति अभियानची इत्यंभुत माहिती जलशक्ति केंद्रामध्ये उपलब्ध करावी. अभ्यांगतांची नोंदवही ठेवण्यात यावी अशा सुचना देण्यात आल्या.

# सद्भावना तिरंगा केंद्रास आज पासून प्रारंभ



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** स्वातंत्र्य महोत्सवानिमित्त सद्भावना तिरंगा व मिठाई केंद्र दि. 13 ते 15 ऑगस्ट 2024 पर्यंत सद्भावना तिरंगा बंगला, हॉटेल सिटी पार्कच्या मागे उपलब्ध राहणार आहे, अशी माहिती सद्भावना सेवा दलाचे प्रमुख दिव्यकांत गांधी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या तिरंगा केंद्रावर तिरंगा ध्वज, ओढणी शेला, टी-शर्ट, पगडी, बॅच यासह 16 नमुन्यांचे तिरंगा वस्तू उपलब्ध आहेत. ड्रायफूट, तिरंगा बर्फी, केशर लाडू, मसाला ड्रायफ्रूट, चिवडा यासह विविध पदार्थ मिळणार आहेत. मागणीप्रमाणे बनविण्यात आलेली फायबरची तीन ते 3.50 फुटाची आकर्षक भारत मातेची मूर्तीही इथे उपलब्ध होणार आहे. गुरुवार दि. 15 ऑगस्ट रोजी सकाळी 11:30 वाजता मान्यवरांच्या हस्ते भारत माता मूर्तीचे पूजन करण्यात येणार आहे. त्यानंतर दि. 20 ऑगस्ट रोजी वंचित, उपेक्षित घटकांना घराघरांमध्ये लाडू वाटप करण्यात येणार आहे.

या पत्रकार परिषदेस ध्रुवेश गांधी, सोना गांधी, स्मृती गांधी, समृद्धी निम्बर्गी, नारायण छाबरीया, प्रकाश लोढा आदी उपस्थित होते.

# पेन्शनर संघटनाच्या वतीने होत असलेल्या साखळी उपोषणास राष्ट्रवादी काँग्रेसचा पाठिंबा

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यापर्यंत पेन्शनर संघटनेच्या मागणी आणि भूमिका पोचवून पाठपुरावा करणार - जिल्हाध्यक्ष संतोष पवार

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महानगरपालिकेमध्ये जवळपास 30 ते 40 वर्ष सेवा प्रामाणिकपणे करून सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांच्या मागणीसाठी जिल्हा परिषद पुनम गेट येथे साखळी उपोषण सुरू आहे त्या उपोषणास राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीर्चा जाहीर पाठिंबा असून या मागण्यांचा पाठपुरावा राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्याकडे पत्राद्वारे करण्यात येईल असे आश्वासन जिल्हाध्यक्ष संतोष पवार यांनी व्यक्त केले..

सोलापूर महानगरपालिका पेन्शनर संघटनेच्या मागण्या खालील प्रमाणे 1) महाराष्ट्र शासन निर्णयानुसार 50 टक्के महागाई भत्ता त्वरित लागू करण्यात यावा व त्या रकमेचा फरक देण्यात यावा

2) 7 वेतन आयोगाप्रमाणे सेवानिवृत्त सेवकांना 1/1/ 2021 ते 31/12/ 2021 अखेर फरक देण्यात यावा

3) 80 वषार्पुढील ज्येष्ठ सेवानिवृत्त सेवक यांना वाढू पेन्शन व फरक देण्यात यावा

4) ज्या सेवकांची सेवा 10 वर्ष 20 वर्ष 30 वर्षे झालेली आहे अशांना आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देण्यात यावा

5) 5 वे 6 वे 7 वें वेतन आयोगानुसार प्रलंबित फरक रक्कम त्वरित देण्यात यावी

6) जे सेवक 30 जून रोजी सेवानिवृत्त झालेले आहेत त्यांना 1 जुलै ही तारीख ग्राह्य धरून वेतनवाढ देण्यात यावी



7) प्रलंबित असलेले पेन्शन विक्रीची रक्कम सत्वर देण्यात यावी

8) सेवानिवृत्त झालेले सेवकांचे अर्जित शिल्लकी रजेचे वेतन ताबडतोब देण्यात यावे

9) सेवानिवृत्त सेवकांची पेन्शन 1 तारखेस बिनचूकपणे अदा करणे बाबत उपाययोजना करावी. या पेन्शनर संघटनेच्या मागण्या करीता राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शासन स्तरावर प्रयत्न करणार असल्याचे जिल्हाध्यक्ष संतोष पवार यांनी सांगितले.

# नवनाथ कोडग यांना दीपस्तंभ आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** हनुमान हायस्कूल व जुनिअर कॉलेज तांदुळवाडीचे शिक्षक नवनाथ ज्ञानेश्वर कोडक यांना दीपस्तंभ आदर्श शिक्षक गौरव पुरस्कार प्राप्त झाला असून यानिमित्ताने त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



प्रसन्न फाउंडेशन आयोजित दीपस्तंभ आदर्श शिक्षक गौरव पुरस्कार वितरण समारंभ २०२४ सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील स्मृती भवन अकलूज येथे आयोजित केला होता.यामध्ये हनुमान हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज तांदुळवाडीचे सहशिक्षक नवनाथ ज्ञानेश्वर कोडग यांना दीपस्तंभ आदर्श शिक्षक गौरव पुरस्कार आयकर आयुक्त नितीन वाघमोडे, पुणे विभाग उपसंचालक भूमी अभिलेख अनिल दत्तात्रेय माने, शिवरत्न शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा सौ. शितलदेवी मोहिते पाटील, गट शिक्षण अधिकारी धनंजय देशमुख, विद्यानिकेतन अकॅडमी इंदापूरचे कुणाल काळे, गुगल टीचर बालाजी जाधव व प्रसन्न फाउंडेशन,प्रसन्न पब्लिकेशनचे अध्यक्ष नवनाथ धांडोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. यावेळी शैक्षणिक क्षेत्रातील कोडग सर यांचे योगदान लक्षात घेता त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला असल्याचे संयोजकांनी सांगितले. त्यांना मिळालेल्या पुरस्काराबद्दल सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन होताना दिसत आहे.